ePaper

| वर्ष - 6 । अंक - 161 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com |मंगळवार| दिनांक 20 सप्टेंबर 2022| पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# शैक्षणिक वर्ष 2022-23 च्या 10वी, 12वी परीक्षेच्या तारखा जाहीर



## आतील पानांत


- चायनीज स्टॉल चालवून राष्ट्रीय बेरोजगार दिन साजरा
- ४०% पाण्याच्या गळतीकडे लक्ष द्या!
- ओ.बी.सी आरक्षणासाठी रस्त्यावर उतरावे लागेल




हे सरकार कार्यकाळ तर पूर्ण करणार नाहीच, आता फक्त एवढाच प्रश्न आहे की सरकार बरखास्त कधी करायचं. भारतीय जनता पार्टीच्या कॅल्क्युलेशननुसार जेव्हा गणितं जुळायला लागतील, तेव्हा भाजपाच हे सरकार बरखास्त करेल. त्यादिवशी एकनाथ शिंदेंना आपण किती मोठी चूक केली आहे, हे लक्षात येईल.

- -जयंत पाटील, राष्ट्रवादी

महाविकास आघाडीच्या काळात सगळ्या गोष्टी अंतिम झाल्या होत्या. टॅक्स बेनिफिट, जागेची किंमत आणि इतर सर्व गोष्टी अंतिम झालेल्या असताना, सरकार बदललं. कदाचित या सरकारने देखील प्रयत्न केलेले असावेत, पण ५ सप्टेंबर रोजी जेव्हा अग्रवाल हे पंतप्रधानांना भेटले आणि त्यानंतर सगळ्याच गोष्टी बदलायला सुरुवात झाली.

-रोहित पवार, राष्ट्रवादी



# विमानतळ पुरंदरऐवजी चाकणला करा!

## ‘फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन’ संघटनेची मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे मागणी

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्याचे नियोजित विमानतळ पुरंदरऐवजी चाकणला करण्याची मागणी ‘फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन’ या उद्योजकांच्या संघटनेने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. औद्योगिक पट्टा असल्याने चाकण परिसरात विमानतळ झाल्यास अनेक परदेशी कंपन्या गुंतवणुकीसाठी पुढे येतील, असा दावा या संघटनेने केला आहे.**

### महाराष्ट्रात गुंतवणुकीस मोठी संधी...

मुंबई विमानतळाशिवाय अन्य पर्याय उपलब्ध नसल्यामुळे अनेक उद्योग येण्यास अनुत्सुक आहेत. त्यादृष्टीने चाकणला विमानतळ सुरू करण्याबाबत विचार करावा, अशी मागणी अभय भोर यांनी केली आहे. सरकारच्या सतत बदलत्या धोरणांमुळे परदेशी उद्योग द्विधा मनस्थितीत आहेत. योग्य पर्याय मिळाल्यास महाराष्ट्रात गुंतवणुकीस मोठी संधी निर्माण होऊ शकते, असेही निवेदनात म्हटले आहे.

फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांनी यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले आहे. चाकणला विमानतळ होणार होते. त्यामुळे अनेक मोठ्या उद्योगांनी चाकणला गुंतवणूक केली. चाकणलगत तळेगाव, रांजणगाव, पिंपरी चिंचवड आदी भागांत औद्योगिक वसाहती मोठ्या प्रमाणात आहेत. तळेगाव-चाकण हे अंतर १५ मिनिटांवर आहे. पोषण वातावरण असल्याने चाकणला विमानतळ झाल्यास परदेशी कंपन्या आकर्षित होऊन राज्यातील गुंतवणुकीत भर पडेल. त्याचा उद्योग क्षेत्रालाही फायदा होईल.

### तळेगाव-चाकण हे अंतर 15 मिनिटांवर



# मोठ्या सोसायटींकडून ओला कचरा घेणे बंद करण्यावर महानगरपालिका ठाम!

## पिंपरी चिंचवड हाऊसिंग फेडरेशनचा महापालिकेच्या या निर्णयाला विरोध कायमच...

। पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

मोठ्या सोसायटींकडून 2 ऑक्टोबरपासून ओला कचरा घेणे बंद करण्यावर पिंपरी चिंचवड महानगरपालिका ठाम, तर पिंपरी चिंचवड हाऊसिंग फेडरेशन या निर्णयाला विरोध करण्यावर ठाम आहे. पिंपरी चिंचवड हाऊसिंग फेडरेशनच्या शिष्टमंडळाची मनपा आयुक्त शेखर सिंह यांच्या बैठक पार पडली यावेळी हे चित्र समोर आल्याचे पहायला मिळाले.

बैठकी विषयी माहिती देताना, पिंपरी चिंचवड हाऊसिंग फेडरेशनचे प्रवक्ता अरुण देशमुख म्हणाले, की आयुक्तांनी सांगितले, की 2 ऑक्टोबरपासून मोठ्या सोसायटीकडून ओला कचरा घेणे महानगरपालिका बंद करणार आहे. केंद्र सरकारच्या 2016 च्या नियमानुसार महानगरपालिका कारवाई करत आहे. हे केंद्र सरकारचे नियम असल्यामुळे त्यांची अंमलबजावणी करावी लागेल.

फेडरेशनच्या प्रतिनिधींनी त्यांना सांगितले, की सोसायटीमधील सदनिका धारक हे वेळेवर महानगरपालिकेला टॅक्स भरतात. पाणी, रस्ते व आरोग्य सुविधा पुरवणे हे स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. पिण्याचे पाणी टँकर द्वारे घेण्यासाठी एक लाख ते दहा लाख रुपये प्रति महिना खर्च करावा लागतो. रस्त्यांवर खूप खड्डे झालेले आहेत, त्यामुळे नागरिकांना त्यावरून वाहने चालवताना खूप त्रास सहन करावा लागतो. आता महानगरपालिकेच्या निर्णयामुळे त्यांच्या आवारात ओला कचरा प्रक्रिया केंद्र उभारावी लागेल. त्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करावा लागेल. त्या केंद्राला लागणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारावर सुद्धा खूप मोठा खर्च करावा लागेल.



### फेडरेशनला महानगरपालिकेच्या निर्णयाचा विरोध

**सोसायट्यांकडे ओला कचरा प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी जागा, पैसे व कर्मचारी नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेने सोसायट्यांचा ओला कचरा उचलावा व त्यावर प्रक्रिया करावी. फेडरेशन आपल्या मागणीवर ठाम आहे, की महानगरपालिकेने सोसायट्यांचा ओला कचरा उचलावा व त्यावर प्रक्रिया करावी. त्यामुळे फेडरेशन महानगरपालिकेच्या निर्णयाचा विरोध करत राहील.**

# ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादीचे वर्चस्व!

## पुणे जिल्ह्यातील 61 पैकी 46 ग्रामपंचायती राष्ट्रवादीच्या ताब्यात

।पुणे। महाईन्यूज ।

पुणे जिल्ह्याच्या उत्तर भागात एकूण ६१ ग्रामपंचायतच्या पंचवार्षिक निवडणुकीचा निकाल आज (ता. १९ सप्टेंबर) लागला. या निकालात तब्बल ४६ ग्रामपंचायतींवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (NCP) वर्चस्व मिळविले आहे, अशी माहिती पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी दिली.याबाबत माहिती जिल्हाध्यक्ष गारटकर म्हणाले की, पुणे जिल्ह्यातील उत्तर भागात जुन्नर तालुक्यातील एकूण ३६ ग्रामपंचायतींपैकी राष्ट्रवादी काँग्रेसने २६ ग्रामपंचायतींवर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. आंबेगाव तालुक्यातील एकूण १८ ग्रामपंचायतींपैकी १४ ग्रामपंचायत या राष्ट्रवादीच्या विचाराच्या आल्या आहेत. तसेच, खेड तालुक्यात पाच ग्रामपंचायतींपैकी चार ग्रामपंचायती, भोर तालुक्यातील दोनपैकी दोन्हीही ग्रामपंचायती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचाराच्या आलेल्या आहेत, असा दावा जिल्हाध्यक्ष गारटकर यांनी केला आहे. आंबेगावात १४ ग्रामपंचायती जिंकून राष्ट्रवादीचे वर्चस्व राखले; मात्र शिंदे गटानेही खाते उघडले. आंबेगावमध्ये माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, जुन्नरमध्ये आमदार अतुल बेनके, खेडमध्ये आमदार दिलीप मोहिते या आमदारांनी आपले गड कायम राखले आहेत, तर भोरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने काँग्रेस पक्षाला धक्का दिला आहे.



### आंबेगावात 14 ग्रामपंचायती जिंकून राष्ट्रवादीचे वर्चस्व राखले; मात्र शिंदे गटानेही खाते उघडले

भोरमध्ये राष्ट्रवादीचा थोपटेंना धक्का; सरपंचपदासह दोन्ही ग्रामपंचायतींवर फडकवला झेंडा आंबेगाव तालुका हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला समजला जातो. त्यानुसार तालुक्यातील १८ ग्रामपंचायतींपैकी १४ ग्रामपंचायती राष्ट्रवादीने जिंकल्या आहेत. राष्ट्रवादीच्या खालोखाल एकनाथ शिंदे गटाने तीन ग्रामपंचायती जिंकल्याचा दावा केला आहे. त्यामुळे शिंदे गटाने आंबेगाव तालुक्यात आढळराव पाटील यांच्या माध्यमातून आपले खाते उघडले आहे. कटकारस्थान करून त्यावेळी मला मुख्यमंत्रिपदावरून काढलं अन् राज्यपाल केलं : सुशीलकुमार शिंदेंचा स्वकीयांवर हल्ला दरम्यान, वाळुंजवाडीचे सरपंच नवनाथ वाळुज यांनी मी कुठल्याही पक्षाचा नाही, असे जाहीर केले आहे, त्यामुळे शिंदे गटाने केलेले संख्याबळ एकाने घटण्याची शक्यता आहे.तरुणांना बेरोजगार भत्ता मिळणे मुश्किल झाले आहे'

गारटकर म्हणाले की, पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, विरोधी पक्ष नेते अजित पवार ,खासदार सुप्रिया सुळे, राज्याचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, आमदार अतुल बेनके, आमदार दिलीप मोहिते,जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष रणजीत शिवतारे, विक्रम खुटवड यांच्या विचाराने विकास कामाच्या जोरावर ग्रामीण भागापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अजेंडा ग्रामपंचायतने ग्रामपंचायतीच्या निकालातून दिसून येत आहे.

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी निवडणुकीच्या निकालानंतर सांगितले.

### आंबेगावात शिंदे गटानेही खाते उघडले

आंबेगाव तालुक्यातील अठरा ग्रामपंचायतींपैकी (Gram Panchayat) १४ ग्रामपंचायतींवर माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेसने (NCP) निर्विवाद वर्चस्व राखले आहे. राष्ट्रवादीने वर्चस्व राखले असले तरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाने माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली तीन ग्रामपंचायतींवर झेंडा फडकावला आहे. भाजप एका ग्रामपंचायतीत विजय झाला आहे.

आंबेगाव तालुक्यातील १८ ग्रामपंचायतींसाठी रविवारी चुरशीने मतदान झाले. तालुक्यातील घोडेगाव येथे आज (ता. १९ सप्टेंबर) अठरा ग्रामपंचायतींचे निकाल जाहीर झाले. माजी मंत्री वळसे पाटील यांनी १४ ग्रामपंचायतीवर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. एकनाथ शिंदे गटाचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी तीन ग्रामपंचायतीवर, तर भारतीय जनता पक्षाने एका ग्रामपंचायत वर्चस्व प्रस्थापित केले आहे. आंबेगावात १४ ग्रामपंचायती जिंकून राष्ट्रवादीचे वर्चस्व राखले; मात्र शिंदे गटानेही खाते उघडले

शिंदे गटाकडून पांचाळे बुद्रूक, वाळुंज वाडी, वडगाव काशिंबेग या ग्रामपंचयती जिंकल्याचा दावा केला आहे. भाजपने राजेवाडी ग्रामपंचायत ताब्यात घेतली आहे. अन्य १४ ग्रामपंचायती राष्ट्रवादी काँग्रेसने जिंकल्या आहेत. त्यामध्ये आंबेगाव गावठाण, थोरांदळे, गंगापूर बुद्रूक, पिंपळगाव तर्फे घोडा, राजपूर, माळीण, शिनोली, आसाणे, कोंढवळ, ढाकाळे, पोखरी, जांभोरी, तिरपाड, फदालेवाडी-उगलेवाडी या ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

## शॉर्ट न्यूज

### किरकोळ वादातून पोलीस कर्मचाऱ्याला मारहाण



।पुणे। महाईन्यूज ।

किरकोळ वादातून पोलीस कर्मचाऱ्याच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू मारून बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना लोहगाव भागात घडली. या प्रकरणी पाच जणांविरूद्ध विमानतळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याप्रकरणी कालिदास खांदवे, माऊली खांदवे (रा. लोहगाव) यांच्यासह पाच जणांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मारहाणीत पोलीस कर्मचारी पी. आर. मोटे हे गंभीर जखमी झाले आहेत. मोटे हे विमानतळ पोलीस ठाण्यात नियुक्तिस आहेत. त्यांनी धानोरी जकात नाका परिसरात मोटार लावली होती. त्यांच्या मोटारीजवळ खांदवे यांनी दुचाकी लावली होती. मोटे यांनी खांदवे याला दुचाकी काढण्यास सांगितले. त्यानंतर खांदवे याने साथीदारांना तेथे बोलावून घेतले. खांदवे आणि त्याच्या साथीदारांनी मोटे यांना मारहाण करुन डोक्यात सिमेंटचा गट्टू मारला. मारहाणीत मोटे गंभीर जखमी झाले.

# पुण्यात एकनाथ शिंदेंच्या डुप्लिकेटवर गुन्हा दाखल!

## सेम टू सेम वेशभूषा करून चमकोगिरी अंगलट

।पुणे । महाईन्यूज

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सारखी वेशभुषा आणि पोषाख परिधान करणारा विजय माने याने सराईत गुन्हेगार शरद मोहोळ याच्यासोबत फोटो काढून तो सोशल मीडियावर व्हायरल केला आहे. खंडणी विरोधी पथक दोनच्या पथकाने व्हॉट्सअॅप आणि फेसबुक या सोशल मीडियाद्वारे माहिती घेतली असताना पोलिसांना एक फोटो मिळाला. फोटो पाहिल्यानंतर सुरुवातीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उभे असून, सराईत गुन्हेगार शरद मोहोळ हा खुर्चीत बसल्याचे दिसत आहे.

:मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सारखीच वेशभूषा आणि कपडे परिधान करून हुबेहुब सीएम एकनाथ शिंदे बनून फिरणाऱ्या तोतया सीएम विजय नंदकुमार मानेवर युनिट दोनच्या पथकाने कारवाई केली आहे. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सराईत गुन्हेगार शरद मोहोळ याच्यासोबत फोटो काढून सोशल मीडियावर व्हायरल केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलं आहे. याबाबत खंडणी विरोधी पथक दोनचे पोलीस उपनिरीक्षक मोहनदास आप्पासाहेब जाधव यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. पोलिसांनी विजय नंदकुमार माने यांच्यावर भांदवी कलम ४१९-५११, ४६९, ५००, ५०१, माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार हे बंडगार्डन पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोमवारी पेट्रोलिंग करत असताना माहिती मिळाली की, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सारखी वेशभुषा आणि पोषाख परिधान करणारा विजय माने याने सराईत गुन्हेगार शरद मोहोळ याच्यासोबत फोटो काढून तो सोशल मीडियावर व्हायरल केला आहे. खंडणी विरोधी पथक दोनच्या पथकाने व्हॉट्सअॅप आणि फेसबुक या सोशल मीडियाद्वारे माहिती घेतली असताना





पोलिसांना एक फोटो मिळाला. फोटो पाहिल्यानंतर सुरुवातीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उभे असून सराईत गुन्हेगार शरद मोहोळ हा खुर्चीत बसल्याचे दिसत आहे. आरोपी विजय माने हा नियमित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सारखी वेशभुषा आणि पोशाख करुन समाजात वेगवेगळ्या कार्यक्रमात सार्वजनिक ठिकाणी जाऊन लोकांचा गैरसमज व्हावा अशा पद्धतीने वावरत होता.

# 40% पाण्याच्या गळतीकडे लक्ष द्या!

## महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना पिंपरी चिंचवड शिवसेनेची निवेदनाद्वारे मागणी



**पिंपरी-चिंचवड । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पिंपरी चिंचवड शहराला मागील दोन वर्षापासून पाणीपुरवठा व प्रशासनाच्या चुकीच्या नियोजनामुळे दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. सध्या समाधानकारक पाऊस झाला असताना व पवना धरण शंभर टक्के भरलेले असताना सुद्धा प्रशासनाकडून दिवसाआड पाणीपुरवठा का केला जात आहे? पवना धरणातून दररोज 500 एम एल डी पाणी उचलले जात असून शहरवासीयांपर्यंत पाणी पोहोचेपर्यंत त्यातील ४० टक्के पाण्याची गळती झालेली असते. शहरवासीयांना सुरळीत पाणीपुरवठा व्हावा या दृष्टिकोनातून महापालिकेकडून स्काडा प्रकल्प राबविण्यात आली. आयुक्तांनी त्यांचा नव्याने पदभार स्वीकारल्यानंतर आपल्याकडून बऱ्याच अपेक्षा आहेत. तरी सदर प्रकरणी जातीने लक्ष घालून गोरगरीब सामान्य नागरिकांना हक्काचे पाणी मिळवून द्यावे, व दररोज पाणीपुरवठा करावा. त्याचबरोबर ४० टक्के होणारी पाणी गळती थांबवावी. त्याबाबत माहिती घेत प्रशासनाकडून जाणून बूजून पाणी गळती केली जाते, याचा तपास लावावा. तसेच पाणी गळती होते कि केली जाते याचा शोध घेऊन नक्की पाणी कोठे मुरते याचा देखील शोध घ्यावा व संबंधितावर कारवाई करण्यात यावी असे निवेदन पिंपरी चिंचवड शिवसेनेकडून आयुक्तांना देण्यात आले.

### शहरवासीयांना दिवसाआड पाणीपुरवठा

पाणीचोरीवर आळा बसविण्यासाठी कोट्यावधी खर्च करत सर्व सोसायट्यांमधे पाणीमीटर बसविण्यात आले. 24×7 पाणी हि योजना करीत कोट्यावधी रूपये खर्च केले.

नवीन पाईप लाईन टाकल्या परंतू पाणीपुरवठा विभाग व प्रशासनाच्या चुकीच्या नियोजनामुळे सर्व योजना फसल्या व नागरिकांना हक्काच्या पाण्यापासून मुकावे लागले. टँकर लॉबी आजही कार्यरत असून काही अधिकाऱ्यांना त्यांचा पाठींबा आहे.

नागरिकांचे हक्काचे पाणी पळविले जात आहे. महापालिकेच्या वतीने विविध योजना व नवनवीन प्रकल्प राबविण्यात आले. परंतु पाणीपुरवठा व प्रशासनाच्या चुकीची व ढिसाळ कारभारामुळे अजूनही शहरवासीयांना दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो.

### निवेदन देतेवेळी यांची होती उपस्थिती...

यावेळी जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, पिंपरी विधानसभा प्रमुख राजेश वाबळे, पिंपरी महिला संघटिका सरिता साने, युवासेना अधिकारी पिंपरी निलेश हाके, निखिल येवले, बशीर सुतार, रवींद्र ब्रम्हे, निलेश तरस, राजेंद्र अडसूळ, प्रशांत कडलक, उमेश रजपूत, नरेश टेकाडे, माऊली जगताप, युवासेना प्रमुख चिंचवड अंकुश कोळेकर, प्रदिप दळवी, विभागप्रमुख सुनील पाटील, शाखा प्रमुख तुषार दहीते, मलिक मुजावर, शुभम भदाणे, रुपेश हिरे, शैला पाचपुते, शैला निकम उपस्थित होते.

# बसपाच्या परिवर्तन मोर्चात नागरिकांनी सहभागी व्हा!

## बहुजन समाज पार्टीचे महाराष्ट्र प्रभारी डॉ. हुलगेश चलवादी यांचे आवाहन

**पिंपरी। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत राहणाऱ्या नागरिकांना २४ तास पाणीपुरवठा, रेल्वे हद्दीतील झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन, गुंठेवारीतील बांधकाम नियमित करण्याबाबत शुल्क कमी करणे, महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये रुग्णांना मोफत उपचार, अनधिकृत बांधकाम, माता रमाई यांचे स्मारक, राष्ट्रपिता महात्मा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक अशा अनेक विषयांना वाचा फोडण्यासाठी आणि या विषयांचा महानगरपालिकेतून प्रश्न मार्गी लावण्यासाठी गुरुवारी (दि.२२) सकाळी ११:३० वाजता बहुजन समाज पार्टीच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर परिवर्तन मोर्चा काढण्यात येणार आहे. बसपाचे प्रदेश अध्यक्ष संदीप ताजने यांच्या मार्गदर्शनाखाली आणि देशाचे प्रभारी डॉ. अशोक सिद्धार्थ आदेशाने आयोजित केलेल्या या मोर्चात शहरातील नागरिकांनी बहुसंख्येने सहभागी व्हावे असे आवाहन बहुजन समाज पार्टीचे महाराष्ट्र प्रभारी डॉ. हुलगेश चलवादी यांनी पत्रकार परिषदेत केले. सोमवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत डॉ. चलवादी बोलत होते. यावेळी पक्षाचे प्रदेश सचिव सुरेश गायकवाड, पुणे जिल्हा प्रभारी अशोक गायकवाड, पुणे जिल्हा उपाध्यक्ष धम्मदिप लगाडे, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सुशिल गवळी, पुणे जिल्हाध्यक्ष रमेश आप्पा गायकवाड, पिंपरी चिंचवड उपाध्यक्ष अनिल रणनवरे आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. चलवादी यांनी सांगितले की, पक्षाचे प्रदेशाध्यक्षांच्या आदेशानुसार राज्याच्या विविध भागांतील झोपडपट्ट्यांमध्ये राहणारे नागरिक, गरिब, वंचिताचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी बहुजन समाज पार्टी त्या-त्या ठिकाणी आंदोलन करीत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात एसआरए अंतर्गत झोपडपट्टी धारकांचे जागेवरच पुनर्वसन करावे आणि प्रत्येक झोपडीधारकास पाचशे स्क्वेअर फुटांचे घर मिळावे.




### माता रमाईच्या स्मारकाचे काम सुरू करावे

बसपाचे प्रदेश सचिव सुरेश गायकवाड यांनी सांगितले की, मागील दोन महिन्यांपूर्वी महानगरपालिकेच्या आयुक्तांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील रुग्णालय व दवाखान्यात उपचारांसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये वाढ केली आहे. ही दरवाढ रद्द करून गोरगरीब नागरिकांना या सर्व रुग्णालय व दवाखान्यांमध्ये मोफत उपचार मिळावे. ही शहरातील सर्व नागरिकांची मुख्य मागणी आहे. तसेच महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप त्वरित करावे. शहरांमध्ये लाखो बांधकामे गुंठेवारीच्या नियमात बसत आहेत परंतु या नियमाचे शुल्क जास्त असल्यामुळे कष्टकरी कामगारांना गोरगरिबांना या गुंठेवारीचे बांधकाम नियमित करण्यात अडचणी येत आहेत याचे शुल्क देखील कमी करावे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे प्रशस्त जागेत स्मारक उभारले जावे तसेच राष्ट्रपिता महात्मा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाचे काम त्वरित चालू करावे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या मागे असणाऱ्या आरक्षित जागेत माता रमाईच्या स्मारकाचे काम सुरू करावे.

# बंजारा ब्रिगेड पिंपरी-चिंचवड शहराध्यक्षपदी प्रताप राठोड यांची निवड



**।पुणे। महाईन्यूज ।**

बंजारा ब्रिगेड पुणे जिल्हा आढावा विभागीय अध्यक्ष जयवंता राठोड तसेच जिल्हा अध्यक्ष दिलीप जाधव यांच्या नेतृत्वात आणि जिल्हा समन्वयक विजय राठोड व विभागीय समन्वयक सूर्यकांत राठोड यांच्या प्रमुख मार्गदर्शनात रविवार दिनांक 18 सप्टेंबर रोजी आढावा बैठक पार पडली. या बैठकीत संघटनेचे पुढील ध्येय धोरण ठरवण्यात आले. तसेच जिल्ह्यातील संघटनात्मक आढावा घेण्यात आला. त्याच बरोबर बंजारा ब्रिगेडच्या पिंपरी-चिंचवड शहराध्यक्षपदी युवा सामजिक कार्यकर्ते प्रताप राठोड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी बंजारा ब्रिगेडचे राहुल चव्हाण तसेच डौंड तालुका अध्यक्ष मिथुन राठोड शिरूर तालुका अध्यक्ष अमोल राठोड तसेच सामजिक कार्यकर्ते देवराज आडे बाळासाहेब जाधव गजानन चव्हाण आणि अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे निवेदन मिथुन राठोड यांनी केले.

## संपादकीय »

# कसले सबलीकरण... हे तर अबलीकरण..

***"महिलांना अपमानित करण्याच्या संस्कृतीचा आपण त्याग करण्याची शपथ घ्यायला हवी", असा उदात्त सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देऊन काही तास व्हायच्या आत गुजरात सरकारने बिल्किस बानोवर बलात्कार करून तिच्या अवघ्या तीन वर्षांच्या मुलीसह १४ जणांचा जीव घेणाऱ्या ११ जणांस जन्मठेपेच्या शिक्षेतून माफी देत त्यांची सुटका केली. असे करून गुजरात सरकारने आपल्याच सर्वोच्च नेत्यास तर तोंडघशी पाडलेच पण त्याचबरोबर समस्त महिला वर्गाचाही अपमान केला, असे म्हणायला हवे.***

या गुन्ह्याचे गांभीर्य ज्यांस माहीत असेल, स्मरत असेल आणि एकंदरच सामाजिक सभ्यतेवर ज्यांचा (अजूनही) विश्वास असेल ते सर्व गुजरात सरकारच्या या निर्णयाने सुन्न झाले असतील. हा सर्वसाधारण गुन्हा नव्हता. दोन दशकांपूर्वीच्या गुजरात दंगलीत १०-११ जणांच्या जमावाने गुजरातच्या दाहोड जिल्ह्यातील लिमखेडा शहरात बिल्किसची कोणत्याही महिलेची कधीही होऊ नये अशी विटंबना केली. एक स्त्री या नात्याने हे दु:ख कमी पडले म्हणून की काय आई म्हणूनही तीस उद्ध्वस्त केले. तिच्या डोळ्यादेखत सालेह या तिच्या तीन वर्षांच्या लेकीला जमिनीवर आपटून मारले आणि नंतर या जमावाने बिल्किसच्या कुटुंबातील व अन्य १४ जणांना ठार केले. आज वयाच्या चाळिशीत असलेली बिल्किस २० वर्षांपूर्वीच्या या भयानक घटनांच्या जखमा सांभाळत आयुष्यात स्थिरावण्याचा प्रयत्न करत होती. आपल्यावर इतके नृशंस अत्याचार करणाऱ्यांना सरकारने मोकाट सोडल्याचे पाहून आज बिल्किस पुन्हा हलली आहे. खरे तर जे झाले त्यामुळे समस्त समाजालाच हादरे बसायला हवेत. पण या अभागी महिलेचे 'बिल्किस बानो' असणे हा सामाजिक संवेदना जागृत होण्यातील महत्त्वाचा अडथळा नसेलच याची खात्री नाही. वेदनांच्या मोजमापनासही धर्मपट्टी लावण्याच्या आजच्या काळात बिल्किसच्या दु:खावर काही विशिष्टांकडून(च) सहवेदनेची फुंकर घातली गेली वा नाही तर त्यात आश्चर्य नाही.

या वास्तवातही आपली सदसद्विवेकबुद्धी शाबूत असणाऱ्यांसाठी या प्रकरणाचा आढावा आवश्यक ठरतो. तो घ्यायचा याचे कारण ज्या सर्वोच्च न्यायालयामुळे हे प्रकरण त्या वेळी धसास लागले, ज्या सर्वोच्च न्यायालयामुळे या प्रकरणाची सुनावणी गुजरातमधून मुंबईत हलवली गेली, त्याच सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडच्या निकालामुळे हे सर्व आरोपी तुरुंगातून सुटू शकले. यात लक्षात घ्यायला हवी अशी आणखी एक बाब म्हणजे त्याच सर्वोच्च न्यायालयामुळे हे प्रकरण धसास लावणाऱ्या तिस्ता सेटलवाड आता तुरुंगात आहेत. आरोप सिद्ध झालेले गुन्हेगार मोकाट आणि त्यांच्यावरील आरोप सिद्ध व्हावेत यासाठी प्रयत्न करणारे सरकारी अधिकारी, कार्यकर्ते तुरुंगात असे हे आजचे वास्तव.




## आनंदी सकाळ

### 'भिऊ नकोस मी पाठीशी आहे!'

श्री विष्णू बळवंत थोरातांनी रचलेल्या श्री स्वामी चरित्र सारामृतात श्री स्वामी समर्थ महाराजांच्या अवताराची पार्श्वभूमी प्रथम अध्यायात विशद केली आहे. त्यानुसार पापाचार वाढला, मोठ्या संख्येने धर्मभ्रष्ट मनमानी करू लागले. वैभवहीनता, गरिबी, दु:खे वाढली. धर्मबंधने शिथिल झाली. वेदवचनांवरचा विश्वास उडू लागला. नास्तिकता वाढली. होमहवनादी पुण्यकर्म अत्यल्प होत गेली. धर्माचा राजाश्रय संपला. विविध विद्या व कला लोप पावू लागल्या. ऐहिक भोगेच्छा बळावल्या. परमार्थाचा जगण्याशी संबंध उरला नाही. अशा प्रतिकूल पतनकाळात भगवान श्री स्वामी समर्थ महाराज अक्कलकोटला अवतरले. यतिराज स्वामी समर्थांचे वैराग्य भगवान शिवासारखे, तेज प्रखर सूर्यासारखे, भक्तांसाठी वात्सल्य मातेप्रमाणे व दुष्ट-उन्मत्तांसाठी कठोर शासन. भगवान श्री स्वामी समर्थ अनादिसिद्ध, दीनबंधू-दु:खितांना परमआधार, एकमेव, नित्य द्वंद्वातीत, भावातीत विमल, अचल, त्रैलोक्यपालक, परमेश्वराचे अनुभवगम्य सद्गुरू रूप आहे. अत्यंत

# सुसह्य सहलखोरीसाठी..



## भूमिका

सरकारी सुट्टीच्या दुसऱ्या शनिवार-रविवारला जोडून आलेला स्वातंत्र्य दिन, त्याला लागून पारसी नववर्ष दिनाच्या मंगळवारनंतर भाकड बुधवार ढकलला की कृष्णजन्माष्टमीच्या पाठीवरून येणाऱ्या गोपाळकाल्यास पुढे करून पुन्हा येणारे शनिवार-रविवार म्हणजे घरकोंबडय़ांनाही घराबाहेर पडायला लावेल असा हा दुर्मीळ योग. एकाच आठवडय़ात इतक्या सुट्टय़ा ठासून भरलेल्या आढळणे अगदीच दुर्मीळ. त्यात हा स्वातंत्र्याचा अमृतकाल आणि वर करोनाची सरत चाललेली भीती. म्हणजे तर पाहायलाच नको. तेव्हा या अशा देवदुर्लभ अमृतकाळातील वातावरणीय अमृत प्राशन करण्याच्या मिषाने माणसांच्या मनातील सहलखोरीच्या भावना उचंबळून आल्या नसत्या तरच नवल. त्यासाठी त्यांस बोल लावता येणार नाही. तथापि



पावसाळय़ात पाऊस पडणे अपेक्षित असले तरी अतिवृष्टी झाल्यास ज्याप्रमाणे पाण्याचा निचरा होत नाही त्याप्रमाणे सद्य:स्थितीत या सुट्टीखोरांच्या उत्साहाचाही निचरा होताना दिसत नाही. त्यामुळे हे समग्र सहलखोर आणि त्यांच्या सुट्टीच्या भावना शहरांत ठिकठिकाणी साचून राहिल्याचे आढळून येते. मानवी मनातील या सहलखोरीचा सामाजिक आविष्कार ही सहजप्रवृत्ती मानली तरी प्रश्न असा की तीस सामोरे जाण्यासाठी सरकारी यंत्रणा सज्ज आहेत का? त्यांच्यात त्याबाबत संवेदनशीलता जागृती झालेली आहे का? तसे काही प्रयत्न झाले का?

या आणि अशा साऱ्या प्रश्नांचे कारण म्हणजे गेले दोन-तीन दिवस अनेक शहरांतून समोर येत असलेले चित्र. त्यात अनैसर्गिक वा ओंगळवाणे काही नाही हे खरे. पण इतक्या महाप्रचंड प्रमाणावर जनसमुदाय जेव्हा घराबाहेर पडतो आणि तो तसा पडणार हे आधीच स्पष्ट असते तेव्हा उद्भवणारी परिस्थिती हाताळण्याचे नियोजनच आपल्याकडे दिसत नाही, ही यातील चिंतेची बाब. यातून अधिक चिंता वाढेल अशी आणखी एक बाब समोर येते. ती म्हणजे पायाभूत सोयीसुविधांची कमालीची मर्यादा. ही आता उत्तरोत्तर अधिकाधिक उसवत जाईल. या आठवडय़ातच येणारी जन्माष्टमी, महिनाअखेरीस सुरू होत असलेला गणेशोत्सव, तो संपल्यानंतर जेमतेम पंधरवडय़ाच्या उसंतीनंतर येणाऱ्या नवरात्रीतील गरबा वगैरे आहेच. या संपूर्ण काळात आपल्या शहरांतील जगणे कमालीचे खडतर होऊन जाते. त्यास यंदा अधिक प्रकर्षांने जाणवणारी रस्त्यांची भीषण अवस्था. ती आज इतकी वाईट आहे याचा अर्थ कालच्या सरकारने त्यासाठी पुरेसे काम केलेले नाही हे मान्य करायला हवे. राज्याची राजधानी ही देशाची आर्थिक राजधानीदेखील आहे. पण ते म्हणायला. प्रत्यक्षात या शहरातील रस्ते ग्रामपंचायतीच्या दर्जाचेच. त्यात कधीही न संपणारी विविध कामे. ती पूर्ण झाल्यावर परिस्थिती सुधारेल अशा आशेने दिवस काढण्याचीही सोय नाही. कारण ही कामे संपतात. पण दुसरी कोणती सुरू होतात. यावर उपाय म्हणून, 'एकदा मेट्रो सुरू झाली की सर्व काही सुरळीत होईल' असे फक्त चिरंतन आशावादीच म्हणू आणि मानू शकतात. मुंबईत ज्या मार्गावर मेट्रो धावते त्या मार्गाखालील रस्त्यावरही तुडुंब वाहनगर्दी असते.

# आनंदचे वारसदार!

**'चेन्नईतले बुद्धिबळ ऑलिम्पियाड आजवर झालेल्यांपैकी सर्वाधिक सुनियोजित म्हटले पाहिजे', अशी सार्वत्रिक प्रतिक्रिया या स्पर्धेसाठी आलेले बहुतांश पाहुणे मायदेशी पोहोचल्यानंतर व्यक्त करतात, ही आपल्यासाठी समाधानकारक आणि अभिमानास्पद बाब.**

चेन्नईपासून काही अंतरावर असलेल्या मामल्लापुरम येथे ही स्पर्धा प्रत्यक्ष खेळवली गेली. त्यासाठी जगभरातून १८६ देशांचे १७०० खेळाडू, प्रशिक्षक, सहायक भारतात आले होते. ऑलिम्पियाड स्पर्धेचे आयोजन हे बहुविध खेळांच्या स्पर्धेप्रमाणेच आव्हानात्मक समजले जाते, कारण नियोजनाचा भार सहसा एका शहराच्या आणि राज्याच्या प्रशासनाला उचलावा लागतो. त्या आघाडीवर तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन आणि त्यांच्या प्रशासनाची कामगिरी खणखणीत होती. स्टॅलिन सरकारमधील अत्यंत वरिष्ठ नोकरशहा संयोजनकार्यासाठी तैनात होते. स्थानिक प्रशासन, कॉर्पोरेट विश्व, असंख्य प्रशिक्षित कार्यकर्ते असा फौजफाटा ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी निगुतीने राबला. माजी जगज्जेता आणि महान बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद हा तमिळनाडू किंवा चेन्नईचा आहे या वास्तवापाशी आत्मसंतुष्ट न राहता, त्याच्या देदीप्यमान कारकीर्दीला शोभेसे संयोजन चेन्नईने करून दाखवले. इतर



सर्व शहरांसाठी आणि राज्य सरकारांसाठी त्यामुळेच हे ऑलिम्पियाड आदर्शवत ठरावे. या ऑलिम्पियाडची आणखी एक गंमत म्हणजे, मुळात ते चेन्नईत होणारच नव्हते. २०२० मध्ये ते रशियात होणार होते. त्या वेळी करोनामुळे ते लांबणीवर पडले आणि यंदाच्या वर्षी युक्रेनवर रशियाने हल्ला केल्यामुळे त्या देशाकडून यजमानपदच काढून घेण्यात आले. ऐन वेळी यजमानपद कोणाला द्यायचे याचे उत्तर भारतीय बुद्धिबळ संघटनेचे सचिव भारतसिंह चौहान यांनी दिले. ही स्पर्धा भारतात भरवून दाखवण्याचे आश्वासन त्यांनी दिले. भारतातून दिल्ली, गुजरात आणि तमिळनाडू या राज्यांनी रस दाखवला. त्यातही तमिळनाडूने १०० कोटी रुपयांची हमी तातडीने देऊन आणि असा तसा निधी तत्परतेने उभा करून बाजी मारली. हल्लीच क्रीडा प्रकल्प आणि स्पर्धामध्ये नवोन्मेषी रुची निर्माण झालेल्या गुजरात राज्याने ही स्पर्धा भरवण्यासाठी जोर लावला होता. परंतु स्पर्धा भरवण्याचा अनुभव आणि पायाभूत सुविधा उभारण्यातली तत्परता या जोरावर तमिळनाडूने बाजी मारली. खेळाडूंच्या कामगिरीकडे वळण्यापूर्वी ही प्रस्तावना आवश्यक, कारण खेळातील यश हे निव्वळ खेळाडूंचे असत नाही. या स्पर्धेपूर्वी भारतात झालेली अशी बहुराष्ट्रीय स्पर्धा म्हणजे दिल्ली राष्ट्रकुल २०१०. त्याही स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी ऐतिहासिक कामगिरी करून दाखवलीच होती. मात्र आजही ती स्पर्धा खेळाडूंच्या कामगिरीसाठी नव्हे, तर सुरेश कलमाडी प्रभृतींच्या घोटाळय़ांसाठीच कुपरिचित आहे. चेन्नई ऑलिम्पियाडच्या बाबतीत हे होणार नाही. किंबहुना, भारतीय बुद्धिबळपटूंच्या कामगिरीइतकीच ती उत्तम संयोजनासाठीही स्मरणात राहील. आता थोडेसे पटावरील भारतीयांच्या कामगिरीविषयी.

## ।। अभंगवाणी ।।



पवित्र सोंवळीं ।
एक तीं च भूमंडळीं ॥१॥
ज्यांचा आवडता देव ।
अखंडित प्रेमभाव ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आरक्षणासाठी रस्त्यावर उतरावे लागेल!

## अंधश्रद्धेमुळेच ओबीसींना आरक्षण मिळाले नाही, छगन भुजबळांची टिका



।मुंबई ।महाईन्यूज ।

राज्यात ओबीसी आरक्षण देण्यास मोदी सरकार टाळाटाळ करत आहे. बिहार, मध्यप्रदेशमध्ये ओबीसी आरक्षण मिळते महाराष्ट्रात का मिळत नाही? प्रत्येक जातीत अनेक वेगवेगळ्या संघटना आहेत. त्या ऐवजी ओबीसी याच टायटल खाली सर्वांनी एकत्र आले पाहिजे. असे प्रतिपादन माजी मंत्री छगन भुजबळ यांनी केले. नवी मुंबईत ओबीसी राजकीय आरक्षण कृतज्ञता मेळावा आयोजित केला होता. यावेळी त्यांनी राजकीय परिस्थितीवरही टोलेबाजी केली. नवी मुंबईत ओबीसी आरक्षण कृतज्ञता मेळाव्याचे आयोजन नवी मुंबई राष्ट्रवादी ओबीसी सेलने केले होते. यावेळी माजी मंत्री छगन भुजबळ, जितेंद्र आव्हाड, आमदार रोहित पवार, तसेच नवी मुंबई जिल्हाध्यक्ष नामदेव भगत संपर्क प्रमुख प्रशांत पाटील आदी स्थानिक नेते उपस्थित होते.

यावेळी छगन भुजबळ यांनी राम मनोहर लोहिया यांचा दाखला देत संसदेत मागणी मान्य झाली नाही तर रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा दिला. देशात अजूनही अंधश्रद्धा फोफावत आहे. अंधश्रद्धेमुळेच ओबीसींना आरक्षण मिळाले नाही, अशी टीका भुजबळांनी केली. तसेच नवी मुंबईतील आमदार गणेश नाईक आणि मंदा म्हात्रे कुठल्या पक्षात राहा पण ओबीसीसाठी लढा असे आवाहन त्यांनी केले. ९ न्यायाधीशांनी सांगितलं आरक्षण दिल पाहिजे पण कोण ना कोण कोर्टात जाऊन आरक्षण रोखण्याचा काम केलं, असंही भुजबळ म्हणाले.

### ओबीसी जनगणनेवरून आव्हाडांची केंद्र सरकारवर टीका

ओबीसींची जनगणना होऊ शकत नाही असं केंद्र सरकारने स्पष्ट केलं होतं. यावरून माजी गुहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी टीका केली आहे. ओबीसींची ५४ टक्के संख्या असल्याने काही पक्ष घाबरत आहेत. म्हणून जनगणना केली जात नाही. ४५० जाती ओबीसींच्या जाती महाराष्ट्रात आहेत. या जाती मुखप्रवाहात आल्याचं नाही. यांना न्याय कसं मिळणार? असा सवाल आव्हाडांनी उपस्थित केला. मनुवादामुळे हे सर्व दबले गेलेत. एक मताने लोकसभेत २७ टक्के आरक्षण देशभरात देऊन टाका. महाराष्ट्रात सर्वात जास्त गरिबी छगन भुजबळांनी अनुभवली आहे. भुजबळांनी सोसलाय म्हणून ते गरिबांसाठी लढताहेत. महाराष्ट्रच राजकारण आपल्या ताब्यात ठेऊ शकतो एवढी आपली ताकद आहे. सर्व सरकारी उद्योग विकले जात आहेत. सरकारी नोकऱ्याच नाही राहिल्या तर हे आरक्षण काय कामाचे अशी टीकाही आव्हाडांनी केली.

### वेदान्ता प्रकल्पावरुन राज्य सरकारवर निशाणा

२०१० ते २०१४ मध्ये इंपेरिकल डेटा गोळा करून केंद्राकडे सर्व राज्यांनी दिला होता. भाजपाला आरक्षण नकोच होते म्हणूनच २०१६ ते २०१८ या काळात त्यांनी इंपेरिकल डेटा दिला नाही. ओबीसी आरक्षण घ्यायचाच होता तर इंपेरिकल डेटा साठी भाजपाच्या सरकार केंद्राशी का भांडले नाही, असा सवाल त्यांनी केला.९९ टक्के काम महाविकास आघाडीने केलं आणि फक्त १ टक्का प्रिंटिंगच काम भाजपने करून सांगतेय की आमच्यामुळे आरक्षण मिळाल. मुंबईतले नेते कारंजे बघताना प्रसिद्धी मिळतेय पण आम्ही लोकांच्या हितासाठी शेतात काम करतोय हे मात्र दाखवले जात नाही. फॉक्सकोनमध्ये ओबीसी मराठा सर्व समाजांना नोकऱ्या मिळाल्या फॉक्सकोनसोबत अडीच लाख नोकऱ्या देणारे आयटी सेंटर गुजरातमध्ये गेलं. महाराष्ट्रातील तरुणांवर उत्तरप्रदेश आणि बिहारप्रमाणे परिस्थिती येऊ नये. महाराष्ट्रातील तरुणांना इतर राज्यात नोकऱ्यांची वणवण भटकावे लागेल, अशी भीती निर्माण झाली असल्याचेही वाटत असल्याचेही आव्हाड म्हणाले.

२०११ ला ओबीसींची जनगणना होणार होती. १०० खासदारांनी मागणी केली होती. प्रणव मुखर्जी यांनी चुकीची जनगणना केली. मात्र ती ही आम्ही मान्य केली. मात्र मोदी सरकारने त्रुटी आहेत सांगत

## नंदुरबार तालुक्यातील ४१ ग्रामपंचायतींवर

# भाजप समर्थकांचे वर्चस्व!

### शिंदे गट समर्थकांना 29 ग्रामपंचायतींमध्ये यश

।नंदुरबार ।महाईन्यूज ।



तालुक्यातील ७५ पैकी ४१ ग्रामपंचायतींवर भाजप समर्थकांनी विजय मिळविला आहे. परंतु, दुधाळे येथील सरपंचपदाच्या निवडणुकीत भाजपचे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांची पुतणी पराभूत झाल्याने गड आला आणि सिंह गेला अशी त्यांची अवस्था आहे. राज्यातील सत्तेत वाटेकरी असलेल्या शिंदे गट समर्थकांनी भाजपला कडवी झूंज देत २९ ग्रामपंचायतींमध्ये यश मिळविले आहे. तालुक्यातील चार ग्रामपंचायतींमध्ये राजकीय पक्षांना स्थान नाही. एका ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादी समर्थकांचे वर्चस्व आहे. या निकालानंतर सत्तेचे दावे-प्रतिदावे होत असले तरी अनेक धक्कादायक निकालही लागले आहेत. आदिवासी विकास मंत्री डॉ. गावित यांची पुतणी आणि नंदुरबार पंचायत समितीचे सभापती प्रकाश गावित यांची मुलगी दुधाळे ग्रामपंचायतीत सरपंचपदाच्या स्पर्धेत पराभूत झाली. प्रतिक्षा वळवी यांना ५५९ तर शिंदे गटाच्या अश्विनी मालचे यांना ११०० मते मिळाली.

**■ राज्यातील सत्तेत वाटेकरी असलेल्या शिंदे गट समर्थकांनी भाजपला कडवी झूंज देत २९ ग्रामपंचायतींमध्ये यश मिळविले आहे. तालुक्यातील चार ग्रामपंचायतींमध्ये राजकीय पक्षांना स्थान नाही. एका ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादी समर्थकांचे वर्चस्व आहे**

प्रतिष्ठेच्या धमडाई ग्रामपंचायतीत शिंदे गटाच्या चंद्रशेखर पाटील यांनी आपल्या सख्या भावांचा समावेश असलेल्या भाजपच्या पॅनलचा पराभव केला. याठिकाणी भावा भावामध्ये रंगलेली लढत चर्चेचा विषय होती. पंचायत समितीचे उपसभापती कमलेश महाले यांची आष्टे ग्रामपंचायत भाजपच्या ताब्यात गेली आहे, हवेलीमध्ये शिंदे गट समर्थकांनी सत्ता कायम ठेवल्याने नंदुरबार शहरालगतच्या वाघोदा, हवेली आणि दुधाळे या तीनही ग्रामपंचायतींमध्ये भाजप समर्थक विजयांपासून वंचित राहिले.

### पुलावरुन तोल गेल्याने युवती दुचाकीसह पाण्यात गेली वाहून

नाशिक : निफाड तालुक्यातील उगाव येथील पुलावरून दुचाकीवरून जात असताना तोल जाऊन पडल्याने महाविद्यालयीन युवती वाहनासह पाण्यात वाहून गेली. स्थानिकांनी धाव घेऊन तिला बाहेर काढले. परंतु, तिचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले. सोमवारी सकाळी सात वाजता ही घटना घडली. तन्वी विजय गायकवाड (१७) असे या मुलीचे नाव आहे. निफाड तालुक्यातील रुई हे तिचे मूळ गाव आहे. शिक्षणासाठी ती शिवडी येथे आजोबा भाऊसाहेब क्षिरसागर यांच्याकडे वास्तव्यास होती. सकाळी तन्वी स्कुटीवरून महाविद्यालयात जाण्यास निघाली. उगाव येथील पुलावरून जात असताना तोल जाऊन ती पाण्यात पडली. मुसळधार पावसामुळे सध्या अनेक नद्या, नाले दुथडी भरून वाहत आहे. ती दुचाकीसह पाण्यात वाहून गेली. स्थानिक ग्रामस्थांच्या ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी धाव घेतली. काही वेळात तिला पाण्यातून बाहेर काढण्यात आले. तातडीने तिला निफाडच्या रुग्णालयात नेण्यात आले. परंतु, तत्पुर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

# मनसेची नागपूर कार्यकारिणी बरखास्त

## नव्या तरुणांना दिली जाणार संधी

। वाई ।महाईन्यूज ।



मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे सध्या विदर्भ दौऱ्यावर आहेत. आपल्या या दौऱ्यात ते मनसेच्या पदाधिकाऱ्यांची चर्चा करत आहेत. तसेच बैठकांच्या माध्मयातून ते पक्षबांधणी करत आहेत. दरम्यान आज त्यांनी नागपूरमध्ये पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी नागपूरमधील मनसेची कार्यकारिणी बरखास्त केल्याची माहिती दिली. लवकरच येथे तरुण नेतृत्वाला संधी दिली जाणार आहे. मला मागील १६ वर्षांत पक्षीय पातळीवर जी प्रगती दिसायला हवी होती, ती दिसली नाही, असे राज ठाकरे यांनी यावेळी सांगितले. नागपूरमध्ये पदाधिकाऱ्यांशी कार्यकर्त्यांशी भेटणं झालं. या भेटण्यातून नागपूर शहराची तसेच पक्षातील नागपूर जिल्ह्यातील सर्व पदं मी बरखास्त करतोय. येणाऱ्या २६ आणि २७ तारखेला घटस्थापना होईल, तेव्हा मी नवी कार्यकारिणी जाहीर केली जाई. यामध्ये काही जुने कार्यकर्ते असतील, काही नव्या कर्यकर्त्यांना संधी दिली जाईल. आमची २७ तारखेला मुंबईत पक्षाची बैठक आहे. त्यानंतर २८ तारखेला ते नागपूरमध्ये परत येतील. तेव्हा ते नागपूर तसेच इतर शाखांची बांधणी करतील, अशी माहिती राज ठाकरे यांनी दिली.

आज पक्षाला १६ वर्षं झाली. मात्र या काळात मला नागपूरमध्ये जसा पक्ष दिसायला हवा होता तसा दिसत नाहीये. इतर जिल्ह्यांच्या तुलनेत नागपूरमध्ये पक्ष वाढलेला नाही. नागपूरमध्ये अनेक धडाडीचे कार्यकर्ते आहेत. त्यांना संधी देणे गरजेचे आहे, असे मला वाटते, असे राज ठाकरे म्हणाले. मी उद्या चंद्रपूरला जातोय. त्यानंतर अमरावतीला जातोय. दोन वर्षांपासून तुम्ही शांत होते, असे मला विचारले जातो. मात्र सत्ताधारी, विरोधक आणि पत्रकार यांच्यातील दोघे-दोघे बोलत होते. बाकीचे सगळेच शांत होते.

## शॉर्ट न्यूज »

### रशियामुळे भारताला ३५ हजार कोटींचा फायदा



।नवी दिल्ली। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

रशियाकडून सवलतीच्या दरामध्ये कच्चं तेल विकत घेतल्याने भारताला जवळजवळ ३५ हजार कोटी रुपयांचा फायदा झाला आहे. फेब्रुवारी महिन्यामध्ये युक्रेन आणि रशियामध्ये सुरु झालेल्या युद्धानंतर रशियावर पाश्चिमात्य देशांनी आर्थिक निर्बंध घातले. त्यामुळेच आपला व्यापार सुरु रहावा म्हणून रशियाने भारताला स्वस्त दरामध्ये कच्चं तेल विकण्यास सुरुवात केली. या सर्व गोष्टींचा फायदा भारताला झाल्याची माहिती या विषयातील तज्ज्ञांनी दिलं आहे.याच वर्षी फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात रशियन फौजांनी युक्रेनवर आक्रमण केलं. त्यावेळी जगभरामध्ये तणावपूर्ण राजकीय परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळेच रशियाकडे अनेक वर्षांपासून तेल विकत घेणाऱ्या काही देशांनी निर्बंध लादत रशियाकडून तेल घेणं बंद केलं.

## चंदीगड युनिव्हर्सिटी व्हिडीओ कांडप्रकरणी

# विद्यार्थी पुन्हा आक्रमक!

### चंदीगड युनिव्हर्सिटी 6 दिवस बंद



**आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर युनिव्हर्सिटी प्रशासनाने वसतिगृहाच्या दोन वॉर्डनना निलंबित केले आहे. तर युर्निव्हर्सिटी सहा दिवसांसाठी बंद ठेवण्यात आली आहे. मुलींच्या कपड्यांबाबत वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या ले कार्बोइसर हॉस्टेलच्या वॉर्डन राजविंदर कौरला युनिव्हर्सिटी प्रशासनाने निलंबित केले आहे. तर पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.**

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

चंदीगड युनिव्हर्सिटीतील एका विद्यार्थिनीने मुलींच्या वसतिगृहातील विद्यार्थिनींचे अंघोळ करतानाचे आक्षेपार्ह व्हिडीओ बनवल्याचा खुलासा झाल्यानंतर रविवारी दिवसभर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी संबंधिक आरोपी विद्यार्थीनी आणि तिच्या प्रियकराला शिमलातून अटक करण्यात आली आहे. या प्रकरणामुळे देशभरातून संताप व्यक्त करण्यात आला. दरम्यान या घटनेतील आरोपींना अटक झाल्यानंतर युनिव्हर्सिटी कॅम्पसमधील आक्रमक विद्यार्थी शांत झाले. मात्र रविवारी रात्री उशिरा पुन्हा एकदा विद्यार्थी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांनी कॅम्पसमध्ये आंदोलन करण्यास सुरुवात केली. त्यामुळे युनिव्हर्सिटी व्यवस्थापन आणि पोलिसांमध्ये खळबळ उडाली. सोमवारी सकाळपासूनचं कॅम्पसमध्ये तणावाचे वातावरण होते. यामुळे कॅम्पसमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

या घटनेमुळे वसतिगृहातील काही विद्यार्थिनींनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती समोर आली होती. मात्र युनिव्हर्सिटी प्रशासन आणि पलिसांकडून ही माहिती खोटी असल्याचे सांगण्यात आले, त्याचवेळी एका बेशुद्ध अवस्थेतील मुलीला ॲम्ब्युलन्समधून नेतानाचा व्हिडीओ इंटरनेटवर खूप व्हायरल झाला होता. दुसरीकडे विद्यापीठ व्यवस्थापन कॅम्पसमधील विद्यार्थ्यांवर या प्रकरणी कोणतेही वक्तव्य न करण्यास दबाव टाकत असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान रविवारी सायंकाळी युनिव्हर्सिटी परिसरात शेकडो विद्यार्थ्यांनी पुन्हा घेराव घावून रास्ता रोको केला, तसेच युनिव्हर्सिटीच्या गेटबाहेर ठिय्या आंदोलन केले. अशा परिस्थितीमुळे पोलिसांची डोकेदुखी वाढली तसेच युनिव्हर्सिटी प्रशासनासमोरही चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते, यावेळी ॲम्ब्युलन्समधून घेऊन जाणाऱ्या विद्यार्थिनीच्या प्रकृतीबाबत विद्यार्थी प्रश्न उपस्थित करत होते. यावर विद्यापीठाच्या व्यवस्थापनाने आंदोलनावर बसलेल्या विद्यार्थिनींना सांगितले की, न्याय मिळावा म्हणून ते आंदोलन करत असलेली मुलगी पूर्णपणे ठीक आहे.

त्यावर आंदोलक म्हणाले की, आधी त्या विद्यार्थिनीला आमच्यासमोर आणा. यानंतर मुलीला घटनास्थळी बोलावून तिने सर्वांसमोर आपली बाजू मांडली. त्यावर विद्यार्थ्यांवर दबाव टाकून हे वक्तव्य केले जात असल्याचा आवाज विद्यार्थ्यांच्या जमावातून आला. व्हिडीओ व्हायरल करणाऱ्या मुलीला अटक करण्यात आली आहे, याची आधी खात्री द्या, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. यावर घटनास्थळी उपस्थित असलेले मोहालीचे डीसी मोहाली यांनी याप्रकरणी तरुणीला अटक करण्यात आली असून एसआयटीही स्थापन करण्यात आल्याचे आश्वासन दिले. लवकरच या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात येईल. मात्र रात्री उशिरापर्यंत आंदोलन सुरूच होते.

# काश्मीरमध्ये काँग्रेसचा भाजपाला धक्का!

### लेह-लडाखमधील पोटनिवडणुकीत मोठा विजय

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।




लेह ऑटोनॉमस हिल डेव्हलपमेंट काउन्सिल (LAHDC) च्या तिमिसगाम जागेसाठी १३ सप्टेंबर रोजी पोटनिवडणूक पार पडली आहे. या निवडणुकीत काँग्रेसने भारतीय जनता पार्टीला धक्का दिला असून येथील जागा राखण्यास काँग्रेसला यश आलं आहे. LAHDC मध्ये भाजपा विजयाचा प्रबळ दावेदार मानला जात होता. यासाठी लडाखचे भाजपा खासदार जाम्यांग त्सेरिंग नामग्याल यांच्यासह विविध प्रमुख नेत्यांनी भाजपाचा प्रचार केला होता.

जम्मू आणि काश्मीरमधील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते गुलाम नबी आझाद यांनी अलीकडेच काँग्रेस पक्षाला रामराम ठोकला आहे. त्यामुळे जम्मू काश्मीर आणि लडाखमध्ये काँग्रेस पक्षाची मोठी हानी झाल्याचं मानलं जात होतं. असं असतानाही काँग्रेसने लडाखमधील पोटनिवडणूक जिंकल्याने सर्वांना धक्का बसला आहे. आझाद यांनी पक्ष सोडल्यानंतर लडाखमध्ये काँग्रेसची ही पहिलीच परीक्षा होती. यामध्ये काँग्रेसनं यश संपादन केलं असून हा विजय काँग्रेससाठी आशेचा किरण ठरत आहे. शनिवारी लडाखमधील तिमिसगाम पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर झाला. या निवडणुकीत काँग्रेसचे ताशी टुंडुप यांना ८६१ मते मिळाली आहेत. तर भाजपाच्या दोरजे नामग्याल यांना ५८८ मते मिळाली. या निवडणुकीत ताशी टुंडुप यांचा विजय झाला आहे. २०२० साली झालेल्या हिल काउन्सिलच्या निवडणुकीत भाजपाने २६ पैकी १५ जागा जिंकल्या होत्या, तर काँग्रेसला नऊ जागांवर विजय मिळवता आला. उर्वरित दोन जागा

## 'भगवान देता है छप्पर फाड के...'; शनिवारी तिकिट खरेदी केले

### रविवारी रिक्षाचालकाला लागली 25 कोटींची लॉटरी

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



'भगवान जब देता है छप्पर फाड के देता है', ही म्हण अगदी तंतोतंत खरी झाली आहे, केरळमधील एका रिक्षाचालकाच्या बाबत. केरळमधील एका तीस वर्षीय रिक्षा चालकाचा लॉटरी लागली आहे. शनिवारी या रिक्षा चालकाने लॉटरीचे तिकिट काढलं होते. रविवारी या रिक्षाचालकाला २५ कोटी रुपयांची बंपर लॉटरी लागली आहे. अनूप बी असे या रिक्षाचालकाचे नाव आहे. अनूप बी श्रीवरहम येथील रहिवासी असून, तो एका हॉटेलमध्ये कामास होता. मात्र, कुटुंबाचा सांभाळ करण्यासाठी अनूपने रिक्षा चालवण्यास सुरूवात केली. अनूपला मलेशियातील एका हॉटेलमध्ये काम करण्यास जायचे होते. त्यासाठी त्याला पुढील आठवड्यात व्हिसा मिळेल, अशी अपेक्षा होती. तसेच, त्यासाठी त्याने कर्जही काढले होते. मात्र, ओणमनंतर रविवारी जाहीर करण्यात आलेल्या निकालात TJ750605 क्रमांकाला २५ कोटी रुपयांची लॉटरी लागल्याचे घोषित करण्यात आले. ती लॉटरी अनूपने खरेदी केली होती. लॉटरी जिंकल्यानंतर अनूप म्हणाला, "माझ्याकडे लॉटरी खरेदी करण्यासाठी पैसे नव्हते. मी मुलाने जमा केलेल्या पैशातून शनिवारी खरेदी केली. रविवारी २५ कोटींचे बक्षीस जिंकल्याची माहिती मिळाली. मी एका सहकारी बँकेकडून ३ लाख रुपयांच्या कर्जासाठी अर्ज केला होता.

## मी आणि सिद्धार्थ जाधव १० वर्षे एकमेकांशी बोलत नव्हतो



मराठी चित्रपटसृष्टीची 'अप्सरा' अर्थातच अभिनेत्री सोनाली कुलकर्णी ही नेहमीच तिच्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखली जाते. ती नेहमीच काही ना काही कारणांमुळे चर्चेत असते. नुकतंच सोनाली कुलकर्णी ही झी मराठी वरील 'बस बाई बस' या कार्यक्रमात सहभागी झाली होती. त्यात तिने सिनेसृष्टीतील विविध विषयांबद्दल भाष्य केले. यावेळी तिने ती आणि सिद्धार्थ जाधव जवळपास १० ते १२ वर्षे एकमेकांशी बोलत नव्हते याबद्दलचा खुलासाही केला. तसेच त्यांच्यात पुन्हा कशाप्रकारे मैत्री झाली याबद्दलही तिने सांगितले. 'बस बाई बस' या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या अनेक कलाकारांना विविध प्रश्न विचारले जातात. त्यावर त्यांना उत्तर द्यावी लागतात. या कार्यक्रमादरम्यान सुबोध भावेने सोनालीला तुझे कधी सहकलाकारासोबत भांडण झाले आहे का? असा प्रश्न विचाराला होता. त्यावर तिने हो असे उत्तर दिले. त्यावर सुबोध भावेने नाव विचारताच सोनालीने पटकन सिद्धार्थ जाधव असे म्हटले. यासोबत तिने एक किस्साही सांगितले. दरम्यान सोनाली कुलकर्णीचा हा व्हिडीओ सध्या चांगलाच चर्चेत आहे. यावेळी तिला अमृता खानविलकरचा फोटो दाखवण्यात आला. त्यावर सोनालीने स्पष्टपणे भाष्य केले आहे. त्यावेळी तिने आपली मैत्री कधीच झाली नाही. कारण आपण कधीच एकत्र काम केलं नाही, असे म्हणाली.

## गौरीला अजिबात आवडत नाही शाहरुखची 'ही' सवय



करण जोहरचा 'कॉफी विथ करण'चा सातवा सीझन सध्या चांगलाच चर्चेत आहे. या शोमध्ये अनेक बॉलिवूड कलाकार हजेरी लावतात. करण त्यांना वैयक्तिक आणि सार्वजनिक आयुष्याबद्दल प्रश्न विचारत असतो. आता या शोचा बहुचर्चित एपिसोड रिलीज झाला आहे. ज्यामध्ये गौरी खान, महीप कपूर आणि भावना पांडे पाहुण्या म्हणून आल्या आहेत. या शोचा नवीन प्रोमो अलिकडेच प्रदर्शित करण्यात आला आहे. प्रोमोमध्ये करण जोहरने गौरीला अनेक प्रश्न विचारले. त्यात ती सुहाना खानला डेटिंगबद्दल कोणता सल्ला देईल आणि शाहरुख खानबरोबरच्या तिच्या लव्ह स्टोरीला कोणत्या चित्रपटाचं नाव समर्पक ठरेल, या प्रश्नांचा समावेश होता. या प्रश्नांची उत्तरं दिल्यानंतर शाहरुखची कोणती सवय अजिबात आवडत नाही, याबद्दल गौरीने खुलासा केला.

# 'बॉईज ३'तीन दिवसात कमावले इतके कोटी




२०१७ आणि २०१८ मध्ये प्रदर्शित झालेला 'बॉईज' 'बॉईज २' ला प्रेक्षकांचे भरभरुन प्रेम मिळाले होते. त्यानंतर आता बॉईज ३ या चित्रपटाला प्रेक्षकांचे भरभरुन प्रेम मिळताना दिसत आहे. या चित्रपटातील धैर्य, ढुंग्या आणि कबीर यांचे त्रिकूट आणि त्यांच्या आयुष्यात येणारी कानडी मुलगी यांची धमाल मस्ती आपल्याला पडद्यावर पाहायला मिळत आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'बॉईज ३'नेही अल्पावधीतच बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई केली. नुकतंच या चित्रपटाचे बॉक्स ऑफिस कलेक्शन समोर आलं आहे.

बॉईज ३ या चित्रपटात धैर्य, ढुंग्या आणि कबीर या त्रिकुटाला किर्तीने दिलेली साथ प्रेक्षकांना विशेष आवडली आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांसह चित्रपटसृष्टी आणि समीक्षकांनीही पसंती दर्शवली आहे. सोशल मीडियावर फक्त आणि फक्त 'बॉईज ३' चा डंका वाजताना दिसत आहे. शाळेपासून सुरु झालेला बॉईजचा हा प्रवास आता महाविद्यालयापर्यंत येऊन पोहोचला आहे.

# बॉलिवूडची 'खल्लास गर्ल'



बॉलिवूडची 'खल्लास गर्ल' म्हणून अजूनही इशा कोपिकरला ओळखलं जातं. ईशाने 'एक था दिल एक थी धडकन' या चित्रपटातून पदार्पण केलं होतं. राम गोपाल वर्मा यांच्या 'कंपनी' चित्रपटातील 'खल्लास' या आयटम नंबरने मात्र तिच्या कारकिर्दीला वेग मिळाला आणि चित्रपटसृष्टीमध्ये तिला 'खल्लास गर्ल' म्हणूनच ओळखलं जाऊ लागलं.

ईशाने ४६ वर्षात पदार्पण केलं आहे. २००६ च्या एका मुलाखतीमध्ये इशा कोपिकर तिच्या 'खल्लास गर्ल'ची तुलना थेट हेमा मालिनी यांच्या 'ड्रीम गर्ल'शी केली होती. ज्याप्रमाणे एका पोस्टरमुळे हेमा मालिनी यांना 'ड्रीम गर्ल' हे नाव पडलं आणि त्यांनी योगायोग म्हणजे त्यांनी त्याच नावाच्या चित्रपटातही काम केलं. आपल्याही बाबतीत तसंच काहीसं घडलं असल्याचं इशाने सांगितलं आहे. इशा म्हणते, "मला कधीच माझ्या 'खल्लास गर्ल' इमेजचा कंटाळा येणार नाही. या गाण्याने मला ओळख मिळवून दिली, शिवाय चित्रपटसृष्टीतही मला याच गाण्यानंतर ओळखलं जाऊ लागलं. मला मिळालेलं 'खल्लास गर्ल' हे बिरुद हेमा मालिनी यांना मिळालेल्या 'ड्रीम गर्ल' या बिरुदाइतकं अभिमानास्पद आहे." इशाने बऱ्याच चित्रपटात काम केलं आहे, हिंदी चित्रपटात ती बहुतेकवेळा आयटम नंबर्समध्येच दिसली. लोकतंत्र' या चित्रपटात झळकणार आहे.

## प्रेम प्रकरणातील अडचणींमुळे पाऊल उचलल्याची शक्यता



एका २९ वर्षीय दाक्षिणात्य अभिनेत्रीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. दीपा नावाच्या या अभिनेत्रीने राहत्या घरी गळफास घेत जीवन संपवलं. दीपाचे खरे नाव पॉलिन जेसिका होते, पण ती दीपा या तिच्या स्टेज नावाने लोकप्रिय आहे. अभिनेत्रीचा मृतदेह तिच्या अपार्टमेंटमधून सापडला आहे. रिपोर्ट्सनुसार, दीपाने हे पाऊल लव्ह लाईफमध्ये सुरू असलेल्या समस्यांमुळे उचलले आहे. साऊथ फिल्म इंडस्ट्रीतील उदयोन्मुख अभिनेत्री दीपा हिने १८ सप्टेंबर रोजी आत्महत्या केली. दीपाचा मृत्यू ही आत्महत्या मानून पोलिसांनी प्राथमिक तपास सुरू केला आहे. काही रिपोर्ट्सनुसार, दीपा एका मुलावर खूप प्रेम करत होती, पण दोघांच्या नात्यात सगळं आलबेल नव्हतं. नात्यातील अडचणींमुळे तिने गळफास घेऊन आत्महत्या केली. दैनिक भास्करने दिलेल्या वृत्तानुसार, दीपाच्या आत्महत्येमागील लव्ह अँगलचाही तपास करून पोलीस त्या व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. दीपा चेन्नईच्या विरुगम्बक्कम मल्लिकाई एव्हेन्यूमध्ये एकटीच राहत होती. दीपाचे नातेवाईक तिला सतत फोन करत होते, पण ती कॉलला उत्तर देत नव्हती. दीपा फोन उचलत नसल्याने तिचा मित्र प्रभाकरन तिच्या घरी पोहोचला.

## शॉर्ट न्यूज »

### बजरंगची कांस्यकमाई



**बेलग्रेड । महाईन्यूज**

भारताचा आघाडीचा कुस्तीपटू बजरंग पुनियाने सर्बियाची राजधानी बेलग्रेड येथे सुरू असलेल्या जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेतील पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात रविवारी कांस्यपदकाची कमाई केली.

बजरंगने कांस्यपदकाच्या लढतीत पोर्तो रिकोच्या सेबॅस्टियन रिव्हेरावर ११-९ अशी सरशी साधली. बजरंगचे हे जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील चौथे पदक ठरले आणि ही कामगिरी करणारा तो पहिलाच भारतीय कुस्तीपटू आहे. बजरंगने यापूर्वी २०१३मध्ये बुडापेस्ट आणि २०१९मध्ये नूर-सुलतान येथे झालेल्या स्पर्धेत कांस्य, तर २०१८मध्ये बुडापेस्ट येथे झालेल्या स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते. ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या बजरंगला यंदाच्या स्पर्धेत सुवर्णपदकासाठी प्रबळ दावेदार मानले जात होते. मात्र, उपांत्यपूर्व फेरीत अमेरिकेच्या जॉन दिआकोमिहालीसकडून बजरंगचा पराभव झाला.

भारत-इंग्लंड एकदिवसीय मालिका

# स्मृती, हरमनप्रीतमुळे भारताची विजयी सलामी!

## इंग्लंड महिला संघावर सात गडी राखून मात

**।होव्ह । महाईन्यूज ।**



**सलामीवीर शफाली वर्मा (१) माघारी परतल्यानंतर मानधना आणि यास्तिक भाटिया (५०) यांनी भारताचा डाव सावरला. त्यांनी दुसऱ्या गड्यासाठी ९६ धावांची भागीदारी रचली. यास्तिका बाद झाल्यानंतर मानधनाने हरमनप्रीतच्या साथीने ९९ धावांची भागीदारी रचली. मानधनाचे शतक हुकले, पण भारताने ४४.२ षटकांत आव्हान पूर्ण करत विजय मिळवला.**

सलामीवीर स्मृती मानधना (९९ चेंडूंत ९१ धावा) आणि कर्णधार हरमनप्रीत कौर (९४ चेंडूंत नाबाद ७४) यांच्या अर्धशतकांच्या बळावर भारतीय महिला संघाने रविवारी पहिल्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडवर सात गडी आणि ३४ चेंडू राखून मात केली.

इंग्लंडच्या दिलेल्या २२८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताची अडखळती सुरुवात झाली. सलामीवीर शफाली वर्मा (१) माघारी परतल्यानंतर मानधना आणि यास्तिक भाटिया (५०) यांनी भारताचा डाव सावरला. त्यांनी दुसऱ्या गड्यासाठी ९६ धावांची भागीदारी रचली. यास्तिका बाद झाल्यानंतर मानधनाने हरमनप्रीतच्या साथीने ९९ धावांची भागीदारी रचली. मानधनाचे शतक हुकले, पण भारताने ४४.२ षटकांत आव्हान पूर्ण करत विजय मिळवला.

# कबड्डीमुळे अस्लम इनामदारचे आयुष्य पालटले!

**।मुंबई । महाईन्यूज ।**



अस्लम इनामदारने २०११मध्ये कबड्डी खेळायला प्रारंभ केला. तेव्हा वडिलांच्या निधनामुळे कुटुंबाची स्थिती हलाखीची होती. पण जिद्दीने खेळत त्याने पुणेरी पलटणकडून प्रो कबड्डी लीगचा गतहंगाम गाजवला. यंदाच्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या उपविजेतेपदाचा शिल्पकार ठरलेला अस्लम आगामी प्रो कबड्डी लीग आणि राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी सज्ज होतो आहे. कबड्डीमुळे आयुष्य पालटल्याचे तो आवर्जून सांगतो. अस्लम हा मूळचा अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान गावचा. वडिलांच्या निधनामुळे आई गावातल्या काही घरांत धुणीभांडी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करायची. कुणाचेही पाठबळ नसल्यामुळे अस्लमसह पाच भावंडांनाही पोटासाठी काबाडकष्ट करावे लागले. त्या दिवसांच्या आठवणींनी गंभीर झालेला अस्लम म्हणाला, "भाऊ-बहीण इतरांच्या शेतांवर मजुरी करायचे, तर मीसुद्धा हॉटेल, रसवंतीगृह, बारमध्ये कामे केली आहेत. पण कबड्डीचा सराव कधीही बुडवला नाही. काही वर्षांनी माझा मोठा भाऊ कबड्डीच्या बळावर पोलिसात रुजू झाला. पण सुरुवातीची काही वर्षे अडचणीच्या काळात लोकांचे कर्ज फेडण्यात गेले. त्यामुळे आईची धुणीभांडी व आम्हा भावंडांची मेहनत सुरूच होती. मग बहिणींची लग्ने झाली. मी ठाण्यात आल्यानंतर जरा बरे दिवस यायला लागले."

अहमदनगर ते ठाणे प्रवास कसा झाला, याबाबत अस्लम म्हणाला, "आधी अहमदनगरला कबड्डी खेळायचो. तिथे बऱ्याच वर्षांची परंपरा आहे. राज्य अजिंक्यपद स्पर्धेपर्यंत मजल मारली. मग २०१५मध्ये प्रथमच राष्ट्रीय उपकनिष्ठ राष्ट्रीय स्पर्धा खेळलो.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही